Impact Factor – 6.625 | Special Issue - 325 | June 2023 | ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**PEER REVIEWED, INDEXED AND REFEREED JOURNAL**

Two Day Interdisciplinary National Conference On

# India@75

Azadi Ka Amrit Mahotsav

- GUEST EDITOR -

**Dr. O. J. Rasal**
**Mr. S. S. Patel**

- CHIEF EDITOR -

**Dr. Dhanraj T. Dhangar**

- EXECUTIVE EDITORS -

**Mr. H. S. Shaikh**
**Mr. C. M. Gangawane**

For Details Visit To : www.researchjourney.net

Printed By : **Academic Book Publications**

Impact Factor – 6.625 ▪ Special Issue - 325 ▪ June 2023 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

**PEER REFREED AND INDEXED JOURNAL**

Two Day Interdisciplinary National Conference On

# INDIA @75

... Guest Editor ...

**Dr. O. J. Rasal**

**Mr. S. S. Patel**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

... Executive Editors ...

**Mr. H. S. Shaikh**

**Mr. C. M. Gangawane**

... Jointly Organized by ...

*Pravara Medical Trust's,*

**Arts, Commerce & Science College, Shevgaon**

Dist. Ahmednagar – 414502

***Printed by :*** Academic Book Publications

Impact Factor – 6.625 ▪ Special Issue - 325 ▪ June 2023 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-Research Journal

Printed by

## Academic Book Publications

Dyandeep Apartment, Plot No. 2, Chaitanya Nagar,

Opp. Progressive English Medium School, Jalgaon - 425 001.

E-mail : academicbooksjalgaon@gmail.com

Ph.: (0257) 2235520, 2232800. Mob.: 93092 60560.

**EDITORIAL POLICIES -** Views expressed in the papers / articles and other matter published in this issue are those of the respective authors. The editor and associate editors does not accept any responsibility and do not necessarily agree with the views expressed in the articles. All copyrights are respected. Every effort is made to acknowledge source material relied upon or referred to, but the Editorial Board and Publishers does not accept any responsibility for any inadvertent omissions.

# : C O N T E N T S :

1. **MSME (Micro, Small, and Medium Enterprises) Business in India** ..... 1
Dr. Mangesh Shirsath

2. **MSME (Micro, Small, and Medium Enterprises) Business in India** ..... 4
Dr. Renuka M. Suryawanshi, Dr. Santosh D. Pawale

3. **Allelopathic effect of Cassia tora on Economic Legumes (Cicer arietinum, Vigna radiata And Glycine max)** ..... 9
Samidha S. Halnar, Harshali R. Dighe

4. **Impact of Covid – 19 on Agriculture** ..... 11
G. M. Bodakhe, R. D. Shelke, R. A. Thombare

5. **Growth Factors and Challenges before Gold Industry in India** ..... 20
Prof. Dr. Sanjay Laxman Argade, Sapna Balkrushna Shahane

6. **Water Pollution and Treatment Method** ..... 22
Jyoti Kadubal Khandagale

7. **Role of Social Media in India** ..... 26
Meherarti Bade

8. **Role of Social Media in India** ..... 29
Varsha D. Dhamale

9. **Artificial Intelligence : The Future** ..... 32
Ashwini Shivajirao Doifode

10. **Effect on Mycorrhizal Fertilizer on Tomato with Respect to Some Morphological and Biochemical Aspect** ..... 37
Sunita Bhagavan Gadekar

11. **Cultural Diversification in Post - Interdependence Period** ..... 40
Hemalata Prakash Joshi

12. **Digital Marketing Trends in India** ..... 44
Komal Ramkrushna Kale

13. **The comparatively study of Nano nanocrystalline Tin Oxide SnO2 & Fluorine doped tin oxide SnO2: F thin films for Solar cell Applications.** ..... 49
B. L. Khatik, G. A. Agale, Dr. R. N. Arle

14. **Management and Utilization of Wells and Borewells in Agriculture Sectoar** ..... 53
Dr. D. B. Kharat, Mr. K. V. Kokare

15. **Role of Microfinance Using Regression Analysis for Women's Economic Empowerment** ..... 55
Mrs. Vanita Suresh Lingayat, Dr. H. S. Lunge

16. **Extraction & Estimation of Chlorophyll from Medicinal Plant** ..... 59
Prof. Yashoda Ramesh Neel

17. **Cloud Computing** ..... 61
Sarita Somnath Raut

18. **A seasonal hematology study in major carps cultured in Ahmednagar district, and effects of probiotic feed on fingerlings growth** ..... 66
Mr. Govind Chandrakant Nikam

19. **Impact of GST on Indian Economy** ........ 77
Prajakta Santosh Sable

20. **Documentation of Some Rare and Endangered Medicinal Plants from Kalsubai - Harishchandragad Wildlife Sanctuary of Ahmednagar District, MS (India)** ........ 80
A. S. Satralkar, B. D. Wagh, S. N. Varpe

21. **Changing Trends in Indian English Literature** ........ 84
Prof. Rameshwar Ganpat Waghmare

22. **A Review on Nanotechnology : Analytical Techniques & Applications** ........ 85
Sonali Bansi Wandhekar

23. **Study of zooplankton diversity in Jayakwadi Dam at Paithan, Dist. Aurangabad, Maharashtra, India** ........ 90
Prof. Ramdas Balu Torade

24. **Indian Economy and Rural Development** ........ 96
Nitin Navnath Zinj

25. **Change in the Indian English Poetry in Pre and Post-Independence Era.** ........ 99
Mr. Chaitany Maruti Gangawane

26. **Redefining Hindu Mythology in Contemporary Indian English Novels with Special Reference to Amish Tripathi's Shiva Trilogy** ........ 105
Sajed Salimoddin Patel, Dr. Ravindra G. Vaidya

27. **Cultural Refluxes in Indian English Fiction : An Overview** ........ 108
Sujata Ashok Gaikwad, Dr. Shrikant Rambhau Susar

28. **A Comparative Study of Indian Farmers on Bamboo Crop in Pre and Post-Independence Era.** ........ 110
Mr. Somnath Dattatray Dhamal, Mr. Ranjeet Anil Tambe

29. **Environment : Sustainable Development** ........ 114
Shital Vinayak Hiwale

30. **Exploring the frontiers of nanotechnology and its implications for the future of Chemistry** ........ 116
Sahil M. Shaikh, Monika B. Khatik, Ismail B. Shaikh and Jayshree K. Khedkar

31. **A study of Mahatma Gandhi's constructive program of rural development**
Dr. Suresh Ramji Dudhkawade

32. **Studies on Biochemical and Histochemical Aspects of Pseudophyllidean Parasite in Fresh Water Fishes from Ahmednagar District (M.S.) India** ........ 124
Mr. Amol Arjun Tathe

33. **In vitro Germination of Pollen Correlation Between Viability (TTC staining) Germinability (In-vitro) of Flowering Plants.** ........ 133
Rahul Bandu Kharat

## मराठी

34. **मराठी साहित्यातील बदलते प्रवाह** ........ 142
प्रा.डॉ. सुनिल विश्वनाथ क्षिरसागर

35. **मराठी साहित्यातील बदलते प्रवाह** ........ 145
डॉ. दत्ताराम राठोड

36. **नटरंग: मराठी कादंबरी ते चित्रपट माध्यमांतर** ........ 149
गणेश एकनाथराव चांदर

37. मानव विकास निर्देशांक आणि भारत ... 152
अर्चना रामनाथ कानवडे, प्रा.डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे

38. स्थानीय सरकार के गठन और तांतमुक्ति ग्राम अभियान का संबंध ... 155
बाळासाहेब भानुदास खरात, डॉ. पापली राम

39. मार्क्सचे धर्मविषयक विचार ... 159
सोपान बाळासाहेब नवथर

40. हिंदी सिनेमा और पटकथा लेखन ... 161
श्रीकांत भाऊसाहेब शिंदे

41. मराठी साहित्यातील वास्तववादी साहित्यप्रवाह: दलित साहित्य ... 163
सुधीर किसनराव त्रिभुवन

42. खेडे 75 ... 166
प्राचार्य हितेंद्र रामरावजी आहेर आणि सहा. प्रा.जयवंत रामदास भदाणे

43. वारकरी कीर्तन संकल्पना स्वरूप ... 168
प्रा राहुल अशोक भाकरे

44. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीयांची परिवर्तनशील कविता ... 170
प्रा. ज्योती आनंदराव दिघे

45. हिंदी साहित्य और सिनेमा ... 172
प्रा. गोरख भोरू इदे

46. महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचाराची सद्यस्थितीतील उपयुक्तता ... 174
प्रा. महेश शिवाजीराव जाधव

47. आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरीचे बदलते प्रवाह ... 176
रामदास पंढरीनाथ कातकडे

48. भारतातील टपाल खात्यातील स्थित्यंतरे : काल आणि आज ... 179
माधवी अशोक मोरे-पिसाळ

49. धूळपावलं कादंबरीतील समाजजीवन ... 181
प्रा. सुरेश लक्ष्मण नजन

50. शांता शेळके यांचे मराठी माणसाच्या हृदयातील मराठी गीते ... 183
प्रा. स्मिता मुरलीधर पालेकर (शहाणे)

51. भारताचे परराष्ट्र धोरण आणि संबंध ... 189
प्रा. मोहन भानुदास परतवाघ

52. गांधी युगातील स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांचे योगदान ... 193
प्रा. शाहुराव पवार

53. स्वातंत्र्याची पंच्याहत्तरवी : जात वास्तव आणि 'फँड्री' ... 198
प्रा. स्वप्निल भारत रणखांबे

54. आर्थिक विकासात परकीय गुंतवणूकीचे महत्त्व ... 202
डॉ. एस. बी. पाते, मनिषा किसन सानप

55. सिनेमा और फिल्मांतरण ... 205
केशव काकासाहेब ससे

56. भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्ष: एक अवलोकन ... 207
रवी सुभाषराव मातभाई

57. मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा एक अभ्यास ... 210
प्रा. गहिनीनाथ लिंबराज शेळके

58. भारताचे परराष्ट्र धोरणाचे तत्त्वे आणि उद्दिष्टे ... 212
गणेश शेषराव शेळके

59. विसाव्या शतकातील स्त्रीवादी इतिहास लेखन प्रवाहाची जडणघडण ........ 215
डॉ. सखाराम मारुती वांढरे

60. साहित्य और सिनेमा: बदलते परिदृश्य ........ 217
प्रा.डॉ. पांडुरंग अशोक दुकळे

61. महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचा समन्वयवादी वैचारीक अनुबंध: महात्मा फुले व न्यायमूर्ती रानडे ........ 220
प्रा.अजित लक्ष्मण भालसिंग

62. सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचे हिंदू धर्म विषयक विचार ........ 223
श्री सोपान लक्ष्मण नवथर

63. मानसिक स्वास्थ्य एक दृष्टिक्षेप ........ 225
सौ. निशा बाळासाहेब खरात, डॉ. सोनुने सुभाष श्रावण

64. सहकारी बँक व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा ........ 229
डॉ. विजय आबासाहेब खर्डे, सुमित रमेश पुलाटे

65. मिर्च मसाला चित्रपटातून अभिव्यक्त होणारे स्त्रीशक्तीकरण ........ 232
डॉ. के. एम. अंबाडे, प्रा. शांता रंगनाथ गडगे

66. हिन्दी साहित्य का इतिहास ........ 234
आरती भाऊराव पवार

67. महानगरीय कथा : संकल्पना व स्वरूप ........ 236
श्री. भागवत बाबासाहेब देशमुख

68. कवी मारुती कसाब यांच्या ''पोरगं शेकत बसलंय'' कवितासंग्रहातून व्यक्त होणारी सामाजिकता ........ 242
डॉ.बालाजी विठ्ठलराव डिगोळे

69. ललितगद्याचे संकल्पनात्मक स्वरूप ........ 248
डॉ. निलेश खरात

70. आनंद पटवर्धन यांच्या 'जयभीम कॉम्रेड' या वास्तवपटातील जात–वर्ग संघर्षाचे चित्रण ........ 250
डॉ. बापू चंदनशिवे

71. हिंदी सिनेमा और भारतीयता ........ 254
प्रा. डॉ. एस. बी. कोलते

72. आत्मनिर्भर भारत ........ 257
प्रा. संपतराव माणिकराव गर्जे

73. मराठी ललितगद्य लेखनातील बदलते प्रवाह ........ 261
ज्योती सुधाकर चव्हाण

74. मराठी साहित्यातील बदलते प्रवाह नव्वोदत्तर कांदबरी आणि समकालीन समाजवास्तव ........ 264
प्रा. सीमा सखाराम डोके

# भारताचे परराष्ट्र धोरण आणि संबंध

**प्रा. मोहन भानुदास परतवाघ**
राज्यशास्त्र विभाग, पी.एम.टी.आर्टस, कॉमर्स, अॅण्ड सायन्स कॉलेज शेवगांव, ता.शेवगांव, जि.अहमदनगर.

**प्रस्तावना :**

*सध्याच्या युगामध्ये जागतिक व्यवस्था ही सर्व राष्ट्रांना परस्परांशी संबंध प्रस्थापित करण्यास भाग पाडणारी आहे. सध्या जगातील कोणताही देश स्वयंपुर्ण नाही, तर सर्व देशांना एकमेकांशी सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करावे लागतात. या बरोबरच सर्व देशांना काही ना काही बंधने पाळावी लागतात राष्ट्रांना त्यांच्या परराष्ट्रीय धोरणामुळे एक निश्चित वाटचाल प्राप्त होते. त्यानुसार आपली ध्येय धोरण ठरविता येतात व आपली उदिष्टये साध्यही करता येतात. देशाच्या हिताची धोरण तयार करून आपले हितसंबंध साध्य करून घेण्याचा परराष्ट्र धोरणाचा उद्येश असतो. आजच्या युगातील देश परस्परांशी औपचारिक व अनौपचारिक तसेच अनियोजित संबंध ठेवताना आपल्याला दिसून येत आहेत.*

तसेच वेगवेगळ्या देशातील नागरिकांचेही एकमेंकासोबत सामाजिक, आर्थिक व व्यावसायिक संबंध निर्माण होत असलेले दिसून येत आहेत. पण अशा प्रकारच्या संबंधाचा विचार पराराष्ट्र धोरणात केला जात नाही. तर परराष्ट्र धोरणात केवळ एका देशाच्या शासनाने दुसऱ्या देशाच्या शासनाशी प्रशासकीय स्तरावर निर्माण केलेल्या परस्पर संबंधाचाच समावेश होतो. देशाच्या हितसंबंधाना राष्ट्रीय हित म्हटले जाते. प्रत्येक देश आपल्या राष्ट्रीय हिताच्या सुरक्षेसाठी परराष्ट्र धोरण निश्चित करत असतो. राष्ट्राचे शासन हे ठरविते की, परराष्ट्रसोबत कशा प्रकाराचे संबंध ठेवले पाहिजे यासाठी काही कृती करावी लागते तर काही कृतीपासुन दुर रहावे लागते. अशा प्रकारे सरकार दुसऱ्या सरकार सोबत कसे संबंध ठेवावेत हे ठरवित असते.

**संशोधन लेखाचा उद्देश :**

१) भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.
२) भारताचे इतर राष्ट्रांशी असलेल्या संबंधाचे अध्ययन करणे.

**परराष्ट्र धोरण म्हणजे काय?**

परराष्ट्र धोरण हे राष्ट्रीय हित साध्य करण्याचे एक साधन आहे. राष्ट्रीय हित ही परराष्ट्र धोरणाची गुरू किल्ली आहे.

नॉर्मन हिल यांच्यामते :-

''एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या संदर्भात दुसऱ्या राष्ट्रांसंबंधी केलेले प्रयत्न किंवा आखलेले धोरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय.''

**भारताचे परराष्ट्र धोरण निर्मिती :**

भारतीय संविधानातील कलम २४६ मध्ये परराष्ट्र धोरण ठरविण्याचा आधिकार भारताच्या संसदेला दिलेला आहे. संसद या आधिकारांची अंमलबजावणी खालील प्रमाणे करते.

१) शासनाला सल्ला देणे.
२) आवश्यक आर्थिक तरतूद करणे.
३) आंतरराष्ट्रीय समस्यांवर घडामोडीवर ठराव पारीत करणे.
४) परराष्ट्र धोरणासंबंधी शासकीय समस्यांची निर्मिती करणे.

या कामासाठी परराष्ट्र व्यवहार विषयक सल्लागार समितीची निर्मीती केलेली आहे. या शिवाय भारतीय संविधानातील कलम २५३ नुसार आंतरराष्ट्रीय करार, तह, संकेत तसेच आंतरराष्ट्रीय परिषदामधील ठरावांबाबत निर्णय घेण्याचा व परराष्ट्र धोरणावर नियंत्रण ठेवण्याचा आधिकार संसदेला आहे. पंतप्रधान व संसद याशिवाय केंद्रीय मंत्रीमंडळ, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे व घडामोंडीचे निरीक्षण व विश्लेषण करून परराष्ट्र मंत्र्याना योग्य ती माहिती देण्याचे काम करते. या कामासाठी मंत्रालयाने १९ विभाग निर्माण केलेले आहेत.

**परराष्ट्र धोरणचे उद्दिष्ट्ये :**

१. देशाच्या एकात्मतेचे आणि अखंडतेचे रक्षण कारण्याचे काम परराष्ट्र धोरण पार पाडत असते.
२. परराष्ट्र धोरणाद्वारे देशाच्या नागरिकांच्या हिताचे रक्षण करण्यात येते.
३. आपल्या परदेशी नागरिकांच्या हितांचे रक्षण करणे.
४. विविध देशाबरोबर आर्थिक व तंत्रज्ञानाविषयक देवाणघेवाण करणे.
५. भुमी विस्तारास विरोध

**भारत आणि पाकिस्तान :**

पाकिस्तानचे संबंध भारताशी संर्घषाचें राहिलेले आहेत. भारत व पाकिस्तान स्वतंत्र झाल्यापासुन भारताची इच्छा नसतानाही पाकिस्तानने भारतासोबत १९४७ ते १९९९ या कालखंडामध्ये चार वेळा म्हणजे १९४७, १९६५, १९७१ व १९९९ मध्ये आक्रमण केली आहेत. भारताला आपले सार्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी पाकिस्तानशी युध्द करावे लागले. या चार युध्दापैकी दोन युध्द हे काश्मीर प्रश्नावरून झाले. तर एक भारताची युध्दक्षमता अजमावण्यासाठी केले व एक युध्द बांगलादेशाच्या स्वांतत्र्यासाठी पाकिस्तानने भारताबरोबर केले.

भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न झालेले आहेत, विशेषत: शिमला शिखर परिषद, आग्रा शिखर परिषद, लाहोर शिखर परिषद, तसेच विविध शांतता आणि सहकार्य उपक्रम पण या प्रयत्नांना न जुमानता सिमेपलीकडील दहशतवादाच्या वारंवार


Printed by : ACADEMIC BOOK PUBLICATIONS

कृत्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध सतत तणावपूर्ण राहिले आहेत.

**भारत व चीन :**

भारत आणि चीन या दोन्ही देशांमध्ये राजकीय संबंधाबाबत गुतांगुत आहे. तरी या दोन्ही देशांनी गेल्या दोन दशकामध्ये नेत्रदिपक प्रगती केलेली आहे. या देशांच्या प्रगतीचे जागतिक अर्थकारण व राजकीय सत्तासामर्थ्याच्या समीकरणावर होत असलेले परिणाम, आता दिसून येत आहेत. पुढील दहावर्षामध्ये जागतिक आर्थिक आणि राजकीय सत्तेचे केंद्रस्थान ठरवण्यामध्ये या दोन्ही देशांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. हे आता स्पष्ट झाले आहे. म्हणून या दोन देशामधल्या परस्पर संबंधाना राजकारणाच्या आंतरराष्ट्रीय पातळीवर अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. हे दोन देश ऐकमेकांशी स्पर्धेचे, सौहार्दाचे, सहाकार्याचे की, संघर्षाचे संबंध ठेवतात यावर पुढील दिशा ठरणार आहे. तरी पण भारताने सुरुवातीच्या काळामध्ये १ एप्रिल १९५० रोजी प्रजासत्ताक चीनला मान्यता देणारा भारत हा साम्यवादी नसलेला जगातील दुसरा व अशिया खंडातील पहिला देश होता.

२९ एप्रिल १९५४ रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व चीनचे पंतप्रधान चाओ झियांग यांच्यामध्ये शांततामय सहजीवनाच्या पाच तत्वांचे प्रतिपादन केले, ती आज पंचशील तत्वे म्हणुन ओळखली जातात.

१) परस्पर देशांच्या प्रादेशिक अखंडतेला व राजकीय सार्वभौमत्वाला मान्यता देणे.
२) कोणीही कोणावर आक्रमण न करणे.
३) एकमेकांच्या अंतर्गत बाबतीत हस्तक्षेप न करणे.
४) एकमेंकाविषयी समता बाळगणे व परस्पर हित जोपासणे.
५) शांततामय सहअस्तित्व.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान झाल्यापासून चीनच्या राष्ट्रध्यक्षाबरोबर २०१४ पासुन २०२३ पर्यत एकुण १८ वेळा भेट झालेली आहे. पण या भेटीचा भारताला फायदा झालेला दिसत नाही, कारण २०१४ च्या जुलै महिन्यात 'ब्रिक्स' परिषदे दरम्यान दोन्ही नेत्यामध्ये चर्चा झाली. पण त्यानंतर लगेचच सप्टेंबर महिन्यात चीनच्या जवानांनी पुन्हा एकदा प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या (एल.ए.सी) चुमार सेक्टरमध्ये घुसखोरी केली. (न्युज पॉइट १८७ जुन २०२०) गेल्या ७० वर्षात नरेंद्र मोदी हे एकमेत भारतीय पंतप्रधान आहेत. ज्यांनी चीनचा ५ वेळा दौरा केला आहे. मात्र इतक्या भेटीगाठी होवूनही सीमेवर दोन्ही देशांमध्ये तणाव केवळ कायम आहे. अस नाही तर त्यात वाढच झाली आहे. (न्यूज पॉइंट १५ जून २०२०) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत-चीन संबंधमध्ये सुधारणा व्हावी म्हणून भेटी घेतल्या पण चीनच्या राष्ट्राध्यक्षाची मानसिकता संबंध सुधारावेत अशी दिसत नाही.

**भारत-रशिया :**

भारत आणि रशियातील विशेष संबंध हे विश्वास, परस्पर सुसंगतता आणि राष्ट्रहितावर आधारित आहेत. दोन्ही देशाना या संबंधाना सलोखा व लोकमान्यता आहे. २००८ मध्ये पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग त्यांच्या रशियाच्या भेटीत म्हणाले होते, ''आपले सामरिक संबंध हे दोन्ही देशातील राजकीय एकमतावर आधारित आहेत. दोन्ही देशात ऐतिहासिक रुपांतरण घडुन आले असले तरी आपल्या भागीदारीचे सार विरल झाले नाही.'' शीतयुध्दकाळात भारत आणि रशिया हे एकमेकांचे विश्वासनिय भागीदार होते. १९९१ मध्ये झालेल्या सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर आणि भारतातील नवउदारमतवादी धोरणांच्या अगमनाने त्याच्या संबंधात जबरदस्त बदल घडुन आले. त्यानंतर दोन्ही देशांनी एकमेकांच्या समस्या आणि बदलते भू-राजकीय संदर्भ समजून घेण्यात प्रचंड प्रगल्भता दाखवली ही चिकाटी फलदायी ठरली आणि दोन्ही देशांनी बहुपक्षीय मंचात सहकार्य करण्याबरोबर संरक्षण तंत्रज्ञान विषयक व आर्थिक क्षेत्र यामधील द्विपक्षीय सहकार्याला गती दिलेला आहे.

भारत हा देश सुरूवातीपासुनच म्हणजे स्वांतत्र्य मिळाल्यापासून जागतिक पातळीवरील कोणत्याही गटात सामिल झाला नाही. तर भारताने अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केलेला आहे. परंतु जगात शांतता नांदावी म्हणुन आजपर्यंत प्रयत्न केलेला आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये रशिया आणि युक्रेन यांच्यातिल युध्द थांबविण्यासाठी अनेक देशांनी प्रयत्न केले. त्यापैकी भारत हा एक देश आहे. हे युध्द थांबविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांसाठी भारताचं नोबेल पुरस्कार समितीने कौतुक केले आहे. या समितीचे उपनेते अस्ले तोजे म्हणाले की ''भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लॉदिमीर पुतीन यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मोदी यांनी कोणतीही धमकी न देता युध्दाच्या परिणामाबद्दल कडक संदेश दिला. आपल्याला आंतरराष्ट्रीय राजकारणात अशा नेत्याची खूप आवश्यकता आहे.'' नरेंद्र मोदीनी रशियाचे अध्यक्ष पुतीने यांना सांगितले की, हे युध्दच युग नाही. भारताने केवळ मैत्रीपूर्ण रितीने आपली भूमिका जाहिर केली.

भारताचे पंतप्रधान २०२२ मध्ये रशियाच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांनी रशियांचे अध्यक्ष यांची भेट घेतली व ऊर्जा क्षेत्रासंबधी सखोल चर्चा केली. याचाच अर्थ असा आहे की भारत-रशिया संबध सुधारण्यामध्ये ऊर्जा क्षेत्र महत्वाची भूमिका बजावणार आहे. यात जीवाश्म इंधनासोबतच आण्विक ऊर्जेचाही समावेश असेल. दोन्ही देशांमधील धोरणात्मक वारसा हा दोन्ही देशांना जोडून ठेवणारा महत्वाचा दुवा आहे. सध्या घडत असलेल्या जागतिक घडामोडींमध्ये भारत व रशिया हे सक्रिय घटक आहेत. भारत-रशिया कडून नैसर्गिक वायूची मोठ्या प्रमाणावर आयात करत आहे व येत्या काळात यात वाढच होईल या बाबत शंका नाही. जरि 'वोस्टोक' वाटाघाटी यशस्वी झाल्या तर जगातील सर्वात मोठ्या ऊर्जा प्रकल्पामध्ये भारताचा समावेश होईल.

उच्च तंत्रज्ञान किंवा हाय टेक्नॉलॉजी ही बाब दोनही देशांसाठी तितकीच हिताची ठरणार आहे. विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील अधिक सहकार्यासाठी संयुक्त आयोग करण्याच्या प्रस्तावावर विचार केला जात आहे. यात क्वांटम, नॅनो टेक्नॉलॉजी, सायबर, कृत्रिम बुध्दीमत्ता, रोबोटिक्स, स्पेस आणि बायो-टेक्नॉलॉजी या सारख्या हाय-टेक

क्षेत्राचा समावेश असणार आहे. चौथ्या औद्योगिक क्रांतीचा गाभा ठरलेल्या फार्मास्युटिकल्स, डिजिटल फायनान्स, रसायने आणि सिरॅमिक्स या क्षेत्रामधील कामागिरीही दोन्ही देशासाठी महत्वाची ठरणार आहे.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लदिमीर पुतिन हे कोरोना महामारी सुरू झाल्यानंतर त्यांनी दुसराच भारत दौरा केला. रशिया राष्ट्राध्याक्षानी पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटण्यासाठी नवी दिल्लीत येणे हे अत्यंत प्रतिकात्मक आणि धोरणात्मक आहे. रशिया भारताशी असलेले संबध सुधारण्यासाठी प्रयत्न करत आहे हेच यातून दिसून येत आहे. भारत रशिया इतकी घट्ट मैत्री आहे. की भारतानं रशियाला दिलेला प्रत्येक शब्द पाळला तर रशियाने ही भारताने दिलेला प्रत्येक हकेला साद दिली आहे.

**भारत-अमेरिका :**

भारत आणि अमेरिका या दोनही देशामध्ये लोकशाही शासन प्रणाली आहे. एक विश्वातील सर्वात मोठी आणि दुसरी विश्वातील सर्वात जुनी अमेरिकेच्या दृष्टिकोनातुन दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळात भारताच्या नवीन संसदीय लोकशाही सरकारचे यश रशियाचा धोरणात्मक मित्र आशिया खंडामध्ये रशियाचा प्रभाव वाढण्याच्या प्रमाणात गणले जाते. तरीपण भारताने अमेरिकेचा मित्र होण्यास नकार दिला. कारण दोन्ही महायुध्दांमध्ये अमेरिका इंग्लंडचे दोस्तराष्ट्र होते, आणि अमेरिकेचे वसाहातिक भारताबद्दलचे धोरण हे परस्पर विरोधी होते. फ्रॅकलिन डी. रूझवेल्ट आणि हॅरी टुमन या अमेरिकी राष्ट्राध्यक्षांनी भारताच्या स्वातंत्र्याकडे जास्त लक्ष दिले नाही. चर्चिल किंवा अॅटली जे दुसऱ्या महायुध्दादरम्यान इंग्लंडचे पंतप्रधान होते. त्यांनी कोणावरही भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांच्या काळामध्ये दबाव आणला नाही. दुसऱ्या महायुध्दांनतर अमेरिका जगातील आर्थिक आणि लष्करी महासत्ता म्हणून उदयास आली. भारत त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात कच्च्या मालाच्या उपलब्धतेमुळे अमेरिकेचा व्यापार भागीदार म्हणून उदयास आला.

गेल्या काही वर्षात भारत-अमेरिकासंबंधामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. गेल्या दशकात संरक्षण क्षेत्रात भारत अमेरिका संबंध चांगलेच सुधारलेले आहेत. भारताने-अमेरिकेकडुन सामरिक महत्वाची विमाने, आधुनिक रडार विकत घेतले आहेत. व्यापार गुंतवणुक आणि कनेक्टीव्हिटीच्या माध्यमातुन जगतिक सुरक्षा, स्थिरता आणि आर्थिक समृध्दीला प्रोत्साहन देण्यासाठी दहशतवादाचा मुकाबला, विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य, अवकाश, ऊर्जा, शेती, सागरी सहकार्य आणि पर्यावरण या सर्व क्षेत्रामधील सहभागात्मक विस्तार झाला आहे. तसेच व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय, कायद्याचे राज्य व लोकशाही या अशा वरील कार्यासाठी अमेरिका व भारत हे दोन्ही देश कटिबध्द आहेत.

**भारत आणि युरोपियन महासंघ:**

भारत-युरोपियन संघ याचे संबंध १९६२ पासुन असित्वात आहेत. युरोपियन आर्थिक संघाबरोबर राजनयिक संबंध स्थापन करणाऱ्या सर्वात पहिल्या काही देशामधील भारत हा एक देश आहे. १९७३ आणि १९८१ मध्ये द्विपक्षीय करार केला होता. २० डिंसेबर १९९३ ला स्वाक्षरी झालेला १९९४ चा सहकार्य करार सविस्तर असा तिसऱ्या पिढीचा करार आहे. भारत-युरोपियन संघ संबंध मजबुत करण्यासाठी दोन्ही बाजुकडुन बरेच पुढाकार घेतले आहेत. चार नियमित शिखर परिषदानंतर २००४ मध्ये भारत व युरोपियन संघ हे डावपेचात्मक भागीदार बनले. आणि २००५मध्ये युरोपियन संघ व भारत खाली दिलेल्या क्षेत्रावर सहमत झाले.

१. बोलणी व सल्लायंत्रणा मजबुत करणे.
२. राजकीय बोलणी आणि सहकार्य सखोल करणे.
३. लोक आणि संस्कृती एकत्र आणणे.
४. धोरण बोलणी आणि सहकार्य वाढवणे.
५. व्यापार आणि गुंतवणुक विकसित करणे.

यानंतर बदलत्या काळानुसार २००८ मध्ये खालील नवीन महत्त्वाची क्षेत्र त्यात समाविष्ट केले आहेत.

१. शांतता व सर्वसमावेशक सुरक्षा वाढवणे.
२. शाश्वत विकास वाढवणे.
३. संशोधन आणि तंत्रज्ञानाला वाढविणे.
४. लोकालोकातील आणि संस्कृतीतील देवाणघेवाण वाढविणे.

**भारत आणि पश्चिम आशिया :**

पश्चिम आशियातील मुख्य देशाबरोबर भारताचे अतिशय महत्वपुर्ण संबंध राहिले असून ते सतत वाढत जाताना दिसून येतात. सुरुवातीपासुन हे संबंध भौगोलिक, धार्मिक आणि लोकचळवळी व व्यापार वृध्दीमुळे हे संबंध घ झालेले आहेत.

**भारत व विकसनशील जग :**

स्वातंत्र्य भारताचे विकसनशील देशाप्रती असलेले परराष्ट्र धोरण हे मागील सहा दशकात भरती ओहोटीच्या वैशिष्ट्यांने सांगितले जाऊ शकते. सुरुवातीला भारताने अलिप्ततावादी चळवळीच्या छताखाली विकसनशील देशाना एकत्र जमवण्याचा आणि त्यांना विकसित करण्यासाठी नेर्तृत्व देण्याचा प्रयत्न केला. पण याचा भारताला फायदा झाला नाही. तरी विकसनशील देशात उत्तेजना देण्यासाठी अवलंबिलेले एक साधन म्हणजे सार्वजनिक व्यवहार चार्तुय जागतिकीरण आणि माहिती क्रांतीच्या काळाने भारताच्या सौम्य सत्तेच्या नविन परिणमांची आगाऊ सुचना दिली. विकसनशील देशात भारतासाठी संस्कृती ही सौम्य सत्तेचा एक सर्वात मोठा महत्वाचा स्त्रोत आहे. भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. सौम्य सत्तेच्या भाषेत भारताचा सर्वात मोठा ठेवा म्हणजे खुप सारे आव्हाने झेलुन सुध्दा यशस्वीपणे कार्यरत असलेली त्याची लोकशाही होय.

**भारत- व्हिएतनाम :**

भारत आणि व्हिएतनाम यांच्या संबंधाना गती मिळाली आहे. हा देश भारतासाठी आर्थिक आणि राजकीय भागीदार म्हणून उदयास आला आहे. भारताचा व्हिएतनामाशी असलेला एकुण व्यापाराने २०२०-२१ मध्ये ३.५ अब्ज डॉलरचा फायदा झाला.

**सारांश :**

भारताने आपले परराष्ट्र धोरण निश्चित करुन त्यांच्या माध्यमातून जगामध्ये अनेक देशांसोबत संबंध वृध्दींगत करण्यास महत्व दिले. भारत नेहमीच आर्थिक, व्यापार, विज्ञान, तंत्रज्ञान, लष्करी, कृषी, दहशतवाद, ऊर्जा इ.क्षेत्रामध्ये भारताने वेगवेगळ्या देशसोबत व्यवस्थिपणे आपले संबंध पार पाडले आहेत. भारत हा विश्वातील सर्वात मोठा लोकशाही असलेला देश म्हणून ओळखला जातो. भारताने सर्व देशांशी सलोख्याचे संबंध ठेवलेले आहेत.

**संदर्भ सूची :**

१. आंतरराष्ट्रीय संबंध : डॉ.सुधाकर कुलकर्णी
२. भारताचे परराष्ट्रीय धोरण : डॉ. शैलेंद्र देवळणकर
३. Https://hi Wikipedia.org.
४. अन्तराष्ट्रीय राजनिती : डॉ.महेंद्र कूमार मिश्रा २०१०
५. आंतरराष्ट्रीय राजकारण संकल्पना सिध्दांत आणि समस्या- संपादन रुमकी बसू २०१७
६. रशिया युक्रेन युध्द - लोकसत्ता ऑनलाईन १६ मार्च २०२३
७. भारत रशिया संबंध आणि जागतिक राजकारण - समीर सरन
८. आंतरराष्ट्रीय संबंध - डॉ. भूपणकुमार शहापुरकर
९. भारत-चीन पंतप्रधान भेटी - न्युज पॉइंट १८ जुन २०२०
१०. भारताच्यार परराष्ट्र धोरणाची निर्मिती -बंडो उपाध्यय जे.
११. भारताचे परराष्ट्र धोरण बदलते आणि शक्तीचे गणित - दास पी. एल.

●●●

Organized by

Pravara Medical Trust's,

## Arts, Commerce & Science College,

Shevgaon, Dist. Ahmednagar, (M.S.) India




Publisher & Printer

**Academic Book Publications**

Dyandeep Apartment, Plot No. 2, Chaitanya Nagar,
Opp. Progressive English Medium School, Jalgaon - 425 001.
**Ph.:** (0257) 2235520, 2232800. **Mob.:** 93092 60560

E-mail : academicbooksjalgaon@gmail.com

Price : ₹ 1000/-